RNI No. MAHBIL/2009/31748

महाराष्ट्र शासन राजपत्र
असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ७, अंक १] मंगळवार, जानेवारी ५, २०२१/पौष १५, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक १

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

नगरविकास विभाग

४था मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मुंबई-४०० ३२, दिनांक ५ जानेवारी २०२१

अधिसूचना

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.

क्रमांक एमयुएम-२०१२/प्र.क्र.२९३/नवि-१७.— ज्या अर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३ च्या पोट-कलम (२), (२A) आणि (३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासनाने मुरुड ग्रामपंचायत, जि. लातूर येथे नगरपरिषद स्थापन करण्याबाबत क्रमांक एमयुएम-२०१२/प्र.क्र.२९३/नवि-१७, दिनांक २२ जानेवारी २०१९ अन्वये **महाराष्ट्र शासन राजपत्र**, भाग-१अ, मध्यवर्ती उप-विभाग, असाधारण क्रमांक ११, दिनांक २२ जानेवारी २०१९ रोजीच्या **राजपत्रात** प्रसिद्ध करण्याचा हेतू जाहीर करून, यासंदर्भात जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या.

आणि ज्याअर्थी, उक्त उद्घोषणेला अनुलक्षून हरकती प्राप्त झालेल्या होत्या ;

आणि ज्याअर्थी, उक्त उद्घोषणेला अनुलक्षून प्राप्त हरकतींचा शासनाने विचार केला असून, सदर हरकती ह्या उद्घोषणा रद्द करण्यासाठी पुरेशा व वैध असल्याचे शासनाचे मत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त उद्घोषणा रद्द करण्यासाठी प्राप्त हरकती ह्या पुरेशा व वैध असल्याबाबत शासनाचे मत झाले असल्याने, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३ च्या पोट-कलम (२) नुसार लातूर जिल्ह्यातील मुरुड महसुली गावाचे रुपांतर मुरुड नगरपरिषदेमध्ये करण्याबाबतची अधिसूचना निर्गमित करणे उचित वाटत नाही ;

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३ च्या पोट-कलम (२), (२A), (३) व (५) अन्वये तसेच महाराष्ट्र जनरल क्लॉजेस ॲक्ट (१९०४ चा I) मधील कलम-२१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे लातूर जिल्ह्यातील मुरुड ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेमध्ये रुपांतर करण्याबाबत क्रमांक एमयुएम-२०१२/प्र.क्र.२९३/नवि-१७, दिनांक २२ जानेवारी २०१९ अन्वये निर्गमित करण्यात आलेली उद्घोषणा रद्द केल्याची घोषणा करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कैलास बधान,
शासनाचे उप सचिव.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th floor, Mantralaya, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 5th January 2021

NOTIFICATION

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No.MUM-2012/C.R.293/UD-17.—Whereas, by the Government Proclamation, Urban Development Department, No. MUM-2012/C.R.293/UD-17, dated the 22nd January 2019, (hereinafter referred to as "the said Proclamation"), published in the *Maharashtra Government Gazette*, Part I-A Central Sub-Division, Extraordinary No.11, dated the 22nd January 2019, issued in pursuance of sub-section *(3)* of section 3 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra had announced its intention to issue a notification under sub-section *(2)*, *(2A)* and *(3)* of section 3 of the said Act, to specify the local area of the revenue village Murud, in Latur District, as a smaller urban area and to constitute a Municipal Council by the name of "the Murud Municipal Council" for the said smaller area and had hereby invited objections and suggestion to the said proposal to submit the same to the Collector, Latur District.

And whereas, objections to the said Proposal were received pursuant to the said Proclamation;

And whereas, on considering the objections received to the said proposal, the Government of Maharashtra is of the opinion that the objections received are sufficient and valid;

And whereas, in view of the opinion of the Government that the objections received are sufficient and valid, the government considers it expedient not issue notification under sub-section *(2)* of section 3 of the said Act to specify the said local area to be a smaller urban area and to constitute a Municipal Council by the name of "the Murud Municipal Council" for the said smaller urban area;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(2)*, *(2A)*, *(3)* and *(5)* of section 3 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) read with section 21 of the Maharashtra General Clauses Act, (I of 1904), the Government of Maharashtra hereby rescinds the Government Proclamation, Urban Development Department, No. MUM-2012/C.R.293/UD-17, dated the 22nd January, 2019.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KAILAS BADHAN,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.